आधुनिक विचारांचे

# वर्तमान



प्रजासत्ताक दिन चिरायू होवो

बीड । बुधवार, २६ जानेवारी २०२२ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | वर्धापन विशेषांक । पाने : ४ । मूल्य २ ₹

**विशेष संपादकीय**

## 'वर्तमान'चे सिंहावलोकन



'आपले वृत्तपत्र, आपला आवाज' हे ब्रीद घेवून बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेत गेल्या ३ वर्षांपासून आधुनिक विचारांचे वर्तमान ताठ मानेने उभा आहे. तो वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांच्या जोरावर खरंतर बीड जिल्ह्याला पत्रकारितेची उज्वल आणि प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. अशा या बीड जिल्ह्यात आधुनिक विचारांचे वर्तमानने सकारात्मक आणि विकासात्मक पत्रकारितेचा धर्म पाळलेला आहे. यापुढेही सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पुढे जात राहू ही वर्धापन दिनानिमित्त ग्वाही देत आहोत. वृत्तपत्रांच्या भाऊगर्दीतही वर्तमानने वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. जिल्ह्यातील प्रामुख्याने माजलगाव मतदारसंघातील अनेक सामाजिक विषय पोटतिडकीने मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यातून अनेक विषयांना न्याय देवू शकलो. याचा सार्थ अभिमान वाटतो. सत्य मांडताना कुणाचीही भीड न ठेवता बातमीशी प्रामाणिक राहून वर्तमान पुढे वाटचाल करत आहे. या वाटचालीत अनेकांचा सहयोग लाभलेला आहे. जाहिरात हा कोणत्याही वृत्तपत्राचा प्राण असतो. छोटी-छोटी वृत्तपत्रे टिकून धरण्यात स्थानिक जाहिरातदारांचे अमूल्य योगदान असते. याची जाणीव आम्हाला आहे. भांडवलदारी वृत्तपत्राच्या तुलनेत आमच्यासारखी अनेक वृत्तपत्रे तग धरून आहेत. त्याचे श्रेय मायबाप वाचकांना दिले पाहिजेत. घेतलेला वसा टाकायचा नाही, या भावनेतून वर्तमानची वाटचाल सुरू आहे. ती पुढेही सुरूच राहील. वर्तमानवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे या वर्धापन दिनानिमित्त ऋण व्यक्त करताना वर्तमानवर असेच प्रेम रहावे ही आशा!

: संपादक

# शेख मंजूर यांच्या हातात लवकरच कमळ?

## आगामी नगरपालिका निवडणुकीत बनू शकतात भाजपचा अल्पसंख्याक चेहरा



▶ प्रतिनिधी

माजलगाव : नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी राष्ट्रवादीचे काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदाचा तडकाफडकी राजीनामा दिल्याने राजकीय क्षेत्रात तर्क वितर्क लढवले जात आहेत. दरम्यान, शेख मंजूर हे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. प्राप्त माहितीनुसार शेख मंजूर यांनी भाजपमधील एका नेत्याच्या मार्गदर्शनामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचा शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याचे बोलले जात आहे.


माजलगाव नगरपालिकेचा नुकताच कार्यकाळ संपलेले माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या पदाचा कार्यकाळ मागील आठवड्यात पूर्ण झाला. यातच त्यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्ष पदाचा राजीनामा जिल्हाध्यक्ष बजरंग सोनवणे यांच्याकडे दिला. माजलगाव नगरपालिका कायम वादाच्या भोवऱ्यातच राहिली. पाच वर्षाच्या सत्तेच्या काळात अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. सुरूवातीला सहाल चाऊस नगराध्यक्ष राहिले. यानंतर उपनगराध्यक्षा असलेल्या सुमनताई मुंडे यांनी काही काळ नगराध्यक्ष म्हणून काम केले. यानंतर नगरसेवकांतून शेख मंजूर हे नगराध्यक्ष झाले.

त्यांच्या वर्षभराच्या कार्यकाळामध्ये कोट्यावधी रूपयांची विकास कामे शहरामध्ये राबविली गेली. परंतु, नगराध्यक्ष शेख मंजूर आणि आमदार प्रकाश सोळंके यांच्यामध्ये विविध कारणावरून नेहमीच खटके उडत गेले. यातून दोघांमध्ये दुरावा निर्माण होत गेला. यातच शुक्रवारी शेख मंजूर यांनी आपल्याकडे असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा ई-मेलव्दारे दिला. या बाबत राजकीय तर्क वितर्क लावले जात आहेत.

दरम्यान, आमदार प्रकाश सोळंके आणि शेख मंजूर यांच्यात राजकीय मतभेद झाल्याने शेख मंजूर हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोडतील अशी चर्चा माजलगाव शहरात केली जात होती, ती पूर्णत्वास गेली. आता भाजपात जावून ते नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचा अल्पसंख्याक चेहरा बनू शकतात. असा राजकिय विश्लेषकांचा कयास आहे.










## संपादकीय

# दबावतंत्रामुळे शाळेची दारे खुली?

कोरोना महामारीमुळे सर्वच क्षेत्राची हानी झाली आहे. त्यात शिक्षण क्षेत्रही मागे कसे राहील. जगावर कोरोना महामारीची आपत्ती कोसळल्यापासून शिक्षण क्षेत्राचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या काळात शाळा–महाविद्यालये बंद करण्यात आली. परंतु आता कोरोना महामारीला दोन वर्षे होत आली असून शाळा बंद करण्याच्या निर्णयाला आता सर्वच स्तरांतून चौफेर विरोध होत आहे. त्यातच जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनीही त्याला पूरक अशी भूमिका मांडली आहे. कोरोना काळामध्ये शाळा बंद ठेवणे तर्कहीन असून त्याचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही. आता नवीन लाट आली तरी शाळा बंद करणे हा शेवटचा पर्याय असायला हवा, असे मत जागतिक बँकेचे शिक्षण संचालक यांनी व्यक्त केले आहे. तसेच कोरोना संकटाचा शिक्षण क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करताना शाळा सुरू झाल्यामुळे कोरोना संसर्गात मोठ्या प्रमाणात वाढ झाली किंवा शाळा या सुरक्षित ठिकाण ठरू शकत नाहीत, अशी कोणतीही उदाहरणे आढळलेली नाहीत आणि मुलांचे लसीकरण होईपर्यंत वाट पाहायला हवी, या भूमिकेलाही कोणता शास्त्रीय आधार नाही. म्हणजेच कोरोना संसर्गातील वाढ आणि शाळा सुरू असणे याचा कोणताही परस्पर संबंध नाही आणि तसे कोणतेही पुरावे आढळलेले नाहीत. त्यामुळेच रेस्टॉरंट, बार, शॉपिंग मॉल सुरू असताना शाळा बंद राहतात, हे तर्कहीन असल्याचे दिसत आहे. कोरोना साथीच्या सुरूवातीच्या काळात परिस्थिती चाचपडल्यासारखी होती. या महामारीशी दोन हात करण्याचे मार्गही माहिती नव्हते. त्यामुळेच शाळा बंद करणे ही जगाची तात्कालिक प्रतिक्रिया होती. परंतु आता बराच काळ निघून गेला आहे. आपल्याकडे अनुभव आणि पुरावे आहेत. त्यामुळे त्याचा आधार घेऊन शाळांबाबत निर्णय घेणे अपेक्षित होते. काही दिवसांपूर्वी राज्यात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव आणि त्यापासून लहान मुलांना असलेला धोका लक्षात घेता राज्यातील शाळा १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानंतर आता राज्यातील कोरोनाची रूग्णसंख्या घटत असून त्याचा प्रभावही कमी झाला आहे. त्यामुळे आता शाळा सुरू करण्यात याव्यात अशी मागणी विविध घटकांतून केली जात होती. विविध संघटनांनीही तशी मागणी सतत लावून धरली होती. कोरोनाची दुसरी लाट ओसरल्यानंतर गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये निर्बंध शिथिल करताना राज्यात शाळा– महाविद्यालये पुन्हा सुरू करण्यात आली होती. कोरोना प्रतिबंधक लशीच्या दोन मात्रा घेतलेल्यांना म्हणजेच लसीकरण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्याची परवानगी देण्यात आली होती. तर शाळांमध्ये पात्र मुलांच्या लसीकरणावर भर देतानाच करोना नियमांचे काटेकोरपणे पालन करीत शाळा सुरू होत्या. मात्र ओमायक्रॉन विषाणूचा प्रादुर्भाव वाढू लागताच जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात शाळा आणि महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातून केवळ १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती. तरी गेल्या काही दिवसांपासून कोरोनाची स्थिती चिंताजनक नसल्याचे लक्षात आल्यानंतर सर्वच स्तरांतून शाळा सुरू करण्याबाबत मागणी होऊ लागली होती. त्यामुळे सोमवारपासून शाळा सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावास हिरवा कंदील मिळाला आहे. तरी सर्व स्तरातून शाळा सुरू करण्याबाबत भाजप शिक्षक आघाडीने राज्यभरात दिलेल्या निवेदनरूपी दणक्यानंतर दबावापोटी शासनाला तसा निर्णय घेणे भाग पडले, असे स्पष्ट दिसत आहे. पहिली ते बारावी म्हणजे ५ वर्षापासून १८ वर्षाच्या आतील मुलांच्या शाळा सुरु होत आहेत. त्यातील १५ वर्षावरील मुलांचे लसीकरण अलीकडेच ३ जानेवारीपासून सुरु झाले आहे. ते अजूनही पुर्ण झालेले नाही. म्हणजेच १५ वर्षाच्या आतील मुलांचे लसीकरण नाही. दुसरीकडे १ मे २०२१ पासून म्हणजे गेल्या आठ महिन्यांपासून १८ वर्षापुढील सर्वांना लस दिली जात आहे. त्यातील अनेकांचा पहिला डोस पूर्ण झाला आहे. म्हणजेच ज्या मुलांचे लसीकरण झाले आहे, त्यांचे कॉलेज बंद आहे. राज्यात मार्च २०२० पासून शाळा बंद करण्यात आल्या. तेव्हापासून संपूर्ण राज्यात सलग एक महिनाही शाळा सुरू करण्यात आलेल्या नाहीत. ग्रामीण भागातील काही प्राथमिक शाळा आणि शहरातील आठवी ते बारावीचे ऑफलाइन होणारे वर्ग सोडले तर राज्यातील मुलांचे संपूर्ण शिक्षण ऑनलाइन पद्धतीने झाले आहे. या शिक्षणामुळे आरटीईने तासिकांबद्दल घालून दिलेल्या नियमांची पायमल्ली केली जात आहे. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये बंद असल्याने कोणतेही शैक्षणिक उपक्रम पूर्ण होत नाहीत. मग अशा वेळी अभ्यासक्रम पूर्ण न करताही विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घेणार, हाच प्रश्न आहे. ही अत्यंत भयानक परिस्थिती असून, सरकारने याकडे वेळीच लक्ष दिले नाही तर पुढच्या अनेक वर्षाचे नुकसान होणार आहे. शाळा बंद असल्यामुळे मुलींच्या विवाहापासून अनेक समस्या डोके वर काढत आहेत. वंचित, गरीब घटकातील मुलांना जीवन सुधारण्यासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे. शाळा बंद ठेवल्यामुळे राज्यातील बहुसंख्येने असलेल्या सर्वसामान्य आणि गरीब वर्गातील, दलित, आदिवासी, भटके समूह आणि शहरी गरिबांच्या मुलांचे शिक्षण धोक्यात आले आहे. खरं म्हणजे कोरोना महामारीचे आरिष्ट्य कोसळल्यापासून गेल्या दोन वर्षापासून विद्यार्थ्यांचे फार मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे ही बाब खरी आहे व शाळा सुरू करण्यासंदर्भात मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे कारण पुढे केले जात आहे. परंतु आता शैक्षणिक वर्ष संपायला केवळ दोन महिने राहिले आहेत. मार्च महिन्यांत शैक्षणिक वर्ष संपणार आहे. दोन वर्षापासून होणारे शैक्षणिक नुकसान आता येत्या दोन महिन्यात कसे भरून निघणार आहे? हा मूळ प्रश्न आहे. तरीही पालकांच्या दबावापोटी शाळेची दारे सुरू करण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे. ते कितपत योग्य ठरेल येणाऱ्या काळात दिसून येईल.

# गोव्यातील राजकीय खिचडी

**गोवा विधानसभेच्या ४० जागा आहेत. बहुमताचा जादुई आकडा २१ आहे. काँग्रेस, भाजप, आप असे सगळेच पक्ष कामाला लागलेत. २१ प्लस'च्या गणितात द्रोण लावण्याचा बाजार गरमागरम आहे. त्यामुळेच उंदीर, माकडांना लाजवतील अश्या पक्षांतरांच्या उड्या राज्यभर बघायला मिळतायत. सर्वच पक्षांनी जिंकण्याची क्षमता' हा उमेदवारीचा एकमेव मापदंड ठरवलाय. त्यामुळे जिंकणाऱ्या घोड्यावरच पैसा लावला जातोय.**




**आज-काल**
**अक्षय शारदा शरद**

बन के इक हादसा बाजार में आ जाएगा
जो नहीं होगा वो अखबार में आ जाएगा
चोर उच्चकों की करो कद्र की मालूम नहीं
कौन, कब, कौन सी सरकार में आ जाएगा

डॉ.राहत इंदोरी यांचा हा शेर गोव्यातल्या सध्याच्या राजकीय वातावरणाचं यथार्थ वर्णन करतो.

जिथं सत्ता तिथं उड्या

जागतिक तापमान वाढीमुळे निसर्गाच्या गंभीर समस्या निर्माण झाल्यात. सकाळी पाऊस, दुपारी ऊन रात्री थंडी. ऋतुचक्र कसंही फिरतंय. मागच्या वर्षी तर बाराही महिने पाऊस होता. यंदा जानेवारीतही कोसळला. ऋतुचक्र आपण बदलवलं. या बदलात अंतर असतं. किमान काही दिवसांचं तरी. गोव्यातले नेते या ऋतुचक्रापेक्षाही गतिमान आहेत. ते पक्ष बदलतात. विजेच्या गतीने. कधीही, केव्हाही. आज इथं तर उद्या तिथं. पुन्हा नवा पक्ष–नवा घरोबा. कधी पंधरा–वीस दिवसांनी तर कधी एक–दोन महिन्यांनी. हे नेते एकेका पक्षाचा दाबजोर मलिदा गट्टम करतात. नेतेच नाही तर त्यांचे कार्यकर्ते आणि पदाधिकारीही पाळीवच झालेत. उंदीर, माकडांना लाजवतील अश्या पक्षांतरांच्या टणाटण–टणाटण उड्या सध्या राज्यभर बघायला मिळत आहेत. आज लग्न–उद्या काडीमोड, नाहीतर निकालानंतर काडी टाकून मोड! पुन्हा नवी मांडणी. पक्ष, संघटना, पक्षाची घटना सगळं काही बासनात. पूर्वी नेत्यांमधे विचारभिन्नता असायची, आता विचारशून्यता उरलीय. राजकारणाचा सगळा बाजार झालाय. त्यात सध्या तर गोव्याचा बाजार भलताच गरम आहे. जिथं सत्ता दिसते, तिथं उड्या. पूर्वी निवडणुकीनंतर उड्या मारणारे उडीबहाद्दर आता अगोदरच पकडतात.

गोव्यातला उंदीरउड्यांचा खेळ

गोव्याचे एक नेते आहेत. ते जाहीर समारंभात बोलतात. त्यांचं एक प्रसिद्ध वाक्य– जिथं सत्ता, तिथं बाबू!' त्यांना बाबू म्हणतात. वयोवृद्ध नको, म्हातारा नको, ते ज्येष्ठ म्हणूया. ते इलेक्ट्रॉनिक नृत्य महोत्सवात नाचतातही. ना धड उजवे, ना धड डावे, सगळेच संधिसाधू झालेत. गोव्यात सध्या हा उंदीरउड्यांचा खेळच मांडलाय. एका नेत्याला उमेदवार पळवला जाणार, याची कुणकुण लागली. झालं! त्यानं तो मतदारसंघ गाठला. उमेदवाराबरोबर पत्रकार परिषद घेतली. सगळ्या पत्रकारांच्या समोर त्याला प्रश्न विचारला. अगदी लहान मुलाला विचारतात तसा. जाणार नाहीस ना पक्ष सोडून?' उमेदवारानेही नाही' या अर्थाने मान हलवली. पत्रकारही धन्य झाले. नेता त्याला घेऊन तिथल्या मंदिरात गेला. त्याला मूर्तीसमोर डोकं टेकवायला लावलं. गड्याची दुसऱ्या दिवशीच पक्षांतराची उंदीरउडी! हे एक उदाहरण. हिमनगाचे टोक' हा शब्दप्रयोगही इथं थिटा पडावा. आता बोला? अमक्या–तमक्याची सत्ता येण्याची चिन्हं दिसताच उंदीर पुन्हा बुलेट ट्रेनच्या वेगाने धावतील. ज्याच्या हाती ससा तो पारधी.

आकडेशाहीच्या नावानं चांगभलं

विधानसभेच्या जागा ४० आहेत. बहुमतासाठीचा जादुई आकडा २१ आहे. प्रत्येक मतदारसंघातली मतदारसंख्या २५ हजारांच्या आसपास आहे. राज्यात सगळ्यात जुना पक्ष मगोप म्हणजेच महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष. गोव्याचे पहिले मुख्यमंत्री, बहुजनवादी नेते दिवंगत भाऊसाहेब बांदोडकर यांनी स्थापन केलेला हा पक्ष. आता मात्र या पक्षाची प्रायवेट लिमिटेड कंपनी झालीय. या कंपनीचे मालक असलेले दोघेही भाऊ राजकारणी आहेत. आम आदमी पक्ष २०१२ला आला. तो प्रामाणिकपणे राबतोय. तृणमूल काँग्रेसने डांगोरा पिटत आत्ता कुठे प्रवेश केलाय. गोवा फॉरवर्ड, रिवोल्यूशनरी गोवन हे स्थानिक पक्ष. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेनं खातं खोललं तरी खूप झालं. बाकी इटुकले–पिटुकले उंदीरमामा. जिथं निवडणुकीचा बाजार तिथं अपक्षवाले आलेच. कुंपणावरचे, दर वाढवून घेणारे अपक्ष. भाजप, काँग्रेसही तसे जुनेच आणि मोठेच पक्ष आहेत. त्यांची धडपड आहे ती २१ प्लस'साठी. जे सध्यातरी अशक्य दिसतंय. त्यामुळे २१ प्लस'च्या गणितात द्रोण लावण्याचा बाजार गरमागरम आहे. त्यामुळे आत्ताही आणि नंतरही उड्या दिसतीलच. लोकशाही नाही तर आकडेशाहीच्या नावानं चांगभलं चालूय सध्या. सर्वच पक्षांनी जिंकण्याची क्षमता' हा उमेदवारीचा एकमेव मापदंड ठरवलाय. फक्त जिंकणाऱ्या घोड्यावरच पैसा लावला जातोय. याचा परिणाम काय, तर सत्ता आणि अर्थकारणामुळे प्रचंड राजकीय अनिश्चितता आणि अस्थिरता निर्माण झालीय. काय होईल हे सांगता येत नाही. हा खेळ बघत बसण्याशिवाय आपल्या हातात काहीच नाही आणि दुसरं काही करायची तयारीही नाही. २०१७च्या निवडणुकीसारखं जादुई आकड्यासाठी यातायात करावी लागू नये म्हणून ही सगळी लढाई आहे. ज्याची जिंकण्याची क्षमता, त्याला उचला, पक्षात घ्या, येत नसेल तर पाठिंबा घ्या. सत्तांतुरा ना भय ना लज्जा!

तृणमूल काँग्रेसच्या प्रचाराचा दणका

गोव्यात आमदारांची खरेदी केली जाते, असं गोव्यात लोक बोलतात, असं देवेंद्र फडणवीस गुरुवारी म्हणाले. ते गोवा निवडणूक प्रभारी आहेत. त्यांनी भाजपची पहिली यादी जाहीर केली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे खरेदी व्यवहारात तथ्य आहेच. अर्थातच, आग आहे तर धूर निघणारच. त्यांचा रोख खरंतर तृणमूलकडे आहे. राज्यात तृणमूल काँग्रेसचा प्रचाराचा दंगा दणक्यात चालू आहे. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, राज्याच्या कानाकोपऱ्यात तृणमूलचा प्रचार सुरु आहे. नेटफ्लिक्सवर सिनेमा मधेच थांबतो. तिथं टीएमसीचं प्रचार गाणं सुरू होतं. दीदी ओ दीदी.' यू ट्यूबवर जा– दीदी भेटते. इंटरनेटवर कुठेही जा– दीदीच दीदी. काही पक्षांचा कारभार हा जागतिक कंपन्यांसारखा असतो. उमेदवाराचा खर्च नावापुरता. बाकी खर्च कितीही आला तरी कंपनीच बघणार. उमेदवाराने सूचना द्यायच्या, कंपनी नियोजन करणार. उमेदवार लढणार, काय बोलायचं ते कंपनी लिहून देऊ. तेवढंच बोलायचं. टीएमसीच्या जाळ्यात ओढले गेलेले माजी मुख्यमंत्री लुईझिन फालेरो हे याचंच उदाहरण. या बेरकी, चतुर नेत्याला खासदारकी आणि पक्षाचं उपाध्यक्षपद दिलं. पण आवाज' नाही दिला. त्यांच्या वतीने महुआ मोईत्रा बोलतात. त्यांच्या बोलण्यातून गोव्याचा दांडगा अभ्यास, आवाका आणि विलक्षण आव दिसतो.

निवडणुकीपूर्वी आश्वासनांची खैरात

सर्वच पक्षांनी निसर्गालाही लाजवेल असा आश्वासनांचा पाऊस पाडलाय. आता केवळ मतदारांच्या प्लेटमधे सूर्य, चंद्र, तारे आणून देऊ इतकंच आश्वासन बाकी उरलंय. खाणी सुरू करू, अमूक प्रकल्प बंद पाडू अशी वचनं दिलीत. वीज, पाणी, रस्ते, प्लॉट, शिक्षण, महिलांना सुरक्षा हे सगळंच अगदी फुकट देऊ केलंय. काम–धंदा, नोकरीची गरजच नाही. खा, प्या, मजा करा. सध्याच्या योजनांचा कागदावर विस्तारही केलाय. त्यातली एक महिलांसाठी गृहआधार' योजना. यात महिन्याला दीड हजार मिळतात. दुसरा पक्ष म्हणाला, आम्ही पाच हजार देऊ. तुमचा गृहआधार' तर आमची गृहलक्ष्मी'! सत्तेचा अजून पत्ताही नाही, पण नावनोंदणीही सुरू झालीय. मतदारही हावरटच झालेत. बाजारात तुरीच्या नोंदणीसाठी हाणामारी होतेय. आणखी एक आश्वासन म्हणजे प्रत्येक घरात एक नोकरी देणार. राज्याची लोकसंख्या सुमारे पंधरा लाख आहे. त्यात मतदार सुमारे अकरा लाख. सध्याचे सरकारी नोकर सुमारे साठ हजार. जे आहेत तेच अतिरिक्त आहेत. त्यात पुन्हा नव्याने भरती सुरू करणार. पुन्हा घरटी एका सरकारी नोकरीची ग्वाही देणार. खोटे बोल, रेटून बोल! वचनेनं किं दरिद्रता?' ही तर बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात. खावा हवा तेवढा!

हुकमी कार्डाची चलती

राज्यात सध्या जात, देव, धर्म यांसारख्या कार्डाचीही चलती आहे. याची निर्मिती माणसांनीच केलीय. सगळ्याच धर्मांची शिकवण मानवतेची आहे. जो धारणा करतो तो धर्म ही एक साधी, सोपी व्याख्या. पण नेत्यांना मतदारांची धारणाच बिघडवायची आहे. सगळ्याच पक्षांचा हा उद्योग सुरू आहे. त्याला अपवाद नसावा ही व्यवस्थेची शोकांतिका आहे. प्रत्येकाचं कूळ–मूळ शोधून कुंडल्या मांडल्या जात आहेत. अमूक उमेदवार तमक्या जातीचा, अमक्या धर्माचा. टीएमसी म्हणजे मंदिर–मशीद–चर्च, असा जाहीर डंका घुमतोय. सोशल मीडियातला हा दंगा राजकारणाची चव सांगतो. यात आणखी संतापजनक एक कार्ड वापरलं जातंय – स्त्री'! ऐन निवडणुकीच्या तोंडावर हाही उद्योग' राज्यभर सुरू आहे. जुनी–नवी प्रकरणं शोधली जात आहेत. जुन्या खटल्यांवरही झोत टाकला जातोय. आत' कुणी जायची शक्यता कमीच. खेळ मात्र मांडलाय. जिथं बाजार तिथं नफेखोरी आलीच. ही बाभळ मतदारांनीच पेरलीय. तो काट्यांऐवजी आंब्याची अपेक्षा कशी करू शकतो? मतदारच अगोदर उंदीर होतो. त्यामुळे त्याच्यावर उंदीरउड्या पाहण्याची वेळ येते. या उड्या कायद्याने कशा बंद होतील हे पाहायला हवं. आम आदमी पक्षही हेच सांगू पाहतोय. आम्ही तसं शपथपत्रच उमेदवाराकडून लिहून घेणार आहोत, असं हा पक्ष म्हणतोय. चला, एक पक्ष तरी या विषयावर गंभीर बोलतोय. कृतीची वाट पाहूयात. किर्तनाने समाज सुधारत नसतो तसा कायदा केला म्हणून पक्षांतर बंद होईल असं नाही. कौन, कब, कौन सी सरकार में आ जाएगा' हे आपण ठरवू तो दिन सुदिन असेल.

(लेखक गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# सोशल मीडियावरील आभासी लोकशाही

**कोरोनाच्या तिसऱ्या लाटेमुळे पाच राज्यातल्या विधानसभा निवडणुकांसाठी केवळ वर्च्युअल प्रचार मोहिमा राबवायला परवानगी देण्यात आली. पण ज्या प्रकारे संसर्ग पसरतोय ते पाहता, संपूर्ण निवडणूकच वर्च्युअल मोडवर होईल, असं दिसतं. पाश्चात्त्य देशांमधे निवडणुकांमधे सोशल मीडियाचा आधार पूर्णपणे घेतला जातो. पण पूर्णपणे वर्च्युअल प्रचार मोहीम कुठेही चालवली जात नाही.**



**विशेष**
**योगेश मिश्र**

काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने पाच राज्यांमधल्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली, तेव्हा वर्च्युअल आणि डिजिटल या आभासी जगातल्या दोन महत्त्वाच्या शब्दांचा वापर वारंवार केला. विधानसभा निवडणुका आभासी होणार आहेत, हे त्यातून स्पष्ट झालं. कोरोनाच्या लाटेमुळे १५ जानेवारीपर्यंत केवळ वर्च्युअल प्रचार मोहिमा राबवायला परवानगी आहे. पण ज्या प्रकारे संसर्ग पसरत आहे; ते पाहता, संपूर्ण निवडणूकच वर्च्युअल मोडवर होईल, असं दिसतं. फक्त मतदानासाठी लोक स्वतः मतदान केंद्रांवर जातील. बाकी प्रचारापासून निकालापर्यंत सगळी कामं वर्च्युअलच असतील. गर्दी होऊ नये म्हणून वर्च्युअलवर जोर आहे. नेते आपापल्या घरी किंवा कार्यालयात बसलेले असतील आणि कार्यकर्त्यांशी वीडियो कॉन्फरन्सिंगच्या आणि वीडियो कॉलच्या माध्यमातून संवाद साधतील. नेते आणि उमेदवार फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम वगैरेंवर लाइव चॅट आणि लाइव शोच्या माध्यमातून लोकांपर्यंत आपलं म्हणणं पोचवतील. नेते जनतेला वर्च्युअलीच भेटतील. शिवाय टीवी प्रसारण, पॉडकास्ट, रेडिओ या माध्यमांतूनही आश्वासनं, आरोप–प्रत्यारोप सुरू राहतील. व्हॉट्सअॅपवर लोकांना मेसेज, वीडियो, फोटो पाठवले जातील. हे सगळं वर्च्युअल असेल. समोर नेता असेलही आणि नसेलही.

वर्च्युअल प्रचाराचं खर्चिक काम

सभांचं आयोजन, कार्यकर्त्यांसाठी गाड्यांची सोय ही कामं खर्चिक असतात. पैसे देऊनसुद्धा गर्दी गोळा केली जाते. त्यामुळे वर्च्युअल प्रचार मोहिमेतून पैसे वाचतील, असा विचार नेतेमंडळी करू शकतात. पण ही बरीचशी चुकीची समजूत आहे. बिहारच्या निवडणुकीकडे उदाहरण म्हणून पाहिलं तर एका अहवालानुसार, तिथं एका वर्च्युअल सभेत राज्याच्या ७२ हजार बूथच्या कार्यकर्त्यांपर्यंत अमित शहा यांचं म्हणणं पोचवण्यासाठी हजारो एलईडी स्क्रीन आणि स्मार्ट टीवी इन्स्टॉल करण्यात आले होते. अशा वर्च्युअल सभांवर सरकारने १४४ कोटी रुपये खर्च केला, असा आरोपही राष्ट्रीय जनता दलाने केला होता. सोशल मीडियावर प्रचार मोहीम चालवण्यासाठी एका मोठ्या टीमची गरज असते. त्याचा खर्चही फार मोठा असतो. कारण ही मोहीम सातत्याने सुरूच राहते. या मोहिमेसाठी तज्ज्ञ मंडळींबरोबरच एखाद्या किंवा अनेक एजन्सींची सेवा घ्यावी लागते. डेटाबेस असावा लागतो. हार्डवेअरची गरज असते. फिजिकल रॅलीपेक्षाही मोठा खर्च वर्च्युअल मोहिमेसाठी होऊ शकतो. दुसरी गोष्ट अशी की, दिल्लीत किंवा लखनौमधे बसून ग्रामीण भागांत वर्च्युअल प्रचार अभियान चालवलं जाऊ शकत नाही. ग्रामीण मतदारांपर्यंत पोचण्यासाठी रेडिओ, टीवी यांसारख्या माध्यमांचा आधार घ्यावा लागेल. त्यासाठी वेगळाच खर्च होईल.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर

टीवी आणि रेडिओचा वापर सत्ताधारी पक्षाच्या हातात असेल, यात दुमत असण्याचं कारण नाही. इतर पक्षही रेडिओ एफएम आणि खासगी चॅनेलच्या माध्यमातून प्रचार करू शकतात. वर्च्युअल रॅलीचा खर्च मोठा असेल. त्यामुळे संचार माध्यमांचा योग्य आणि अचूक वापर केला तरच फायदा होऊ शकतो. स्मार्टफोनच्या माध्यमातून कोट्यवधी लोकांपर्यंत पोचण्याची योजना पक्षांकडून बनवली जाईल. वर्च्युअल प्रचार मोहिमांमुळे उमेदवारांना समर्थकांशी संवाद करण्याची आणि समग्र मतपेढीवर प्रभाव पाडण्याची संधी मिळते. उमेदवार अशा लोकांपर्यंत पोचू शकतात, जे सभांना येत नाहीत. नेत्यांची भाषणं ऐकत नाहीत किंवा ऐकू शकत नाहीत. उमेदवार थेट जनतेच्या संपर्कात राहतील आणि महत्त्वपूर्ण मुद्दे अधोरेखित करण्याची संधी त्यांना मिळेल. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या चुका आणि कमकुवत दुवे याबाबत जागरूकता निर्माण करू शकतात. वर्च्युअल प्रचारामुळे उमेदवार आणि पक्ष ट्विटर, इन्स्टाग्रामसह विविध प्रकारच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून आपल्या लोकांबद्दल खूप काही जाणून घेऊ शकतात, शिकू शकतात. एकदा आपल्या मतदारांना समजून घेतले की संपूर्ण प्रचार अभियानात त्यांना कसे सोबत घेता येईल, याचा अंदाज उमेदवारांना येऊ शकतो.

वर्च्युअली तोट्याचं गणित

वर्च्युअल प्रचार मोहिमेसमोर काही स्वतंत्र आव्हानं आहेत. लोकांपर्यंत ऑनलाईन पोचणं आणि आपले विचार मांडणं काही कारणांमुळे कठीणही होऊन बसतं. एखाद्या वर्च्युअल रॅलीला कुणी आलंच नाही, असंही होऊ शकतं. ऑनलाईन प्रचारात काळाची किंवा वेळेची आडकाठी नसते. त्यामुळे जिथं मतदार आहेत, तिथं थेट जोडून घेता येते. मतदार इतर कामात व्यस्त असतील, तर वर्च्युअल भाषण किंवा रॅलीशी स्वतःला कनेक्टच करणार नाहीत. फिजिकल रॅलीत मात्र गर्दी जमवणं तुलनेनं सोपं आहे. पण एका विशिष्ट वेळेत लोकांना स्मार्टफोन किंवा टीवीसमोर आणणं अवघड आहे. संभाव्य मतदारांना डिजिटल प्रचारात रसच वाटणार नाही, असंही घडू शकतं. वर्च्युअल भाषणं ऐकणारे लोक शेवटपर्यंत टिकून राहतील, असंही नाही. ही वर्च्युअल प्रचारातली मोठी आव्हानं आहेत. आभासी बैठकीत सामील होणं सोपं आहे, तितकंच आभासी बैठकीतून बाहेरही सहज पडता येतं. कारण हे काम अवघ्या एका क्लिकवर होऊ शकतं.

जगभरात काय झालं?

कोरोना महामारीच्या आधी वर्च्युअल निवडणूक प्रचार मोहिमेचा वापर व्यापक प्रमाणात कोणत्याही देशात झाला नाही. पाश्चात्त्य देशांमधे निवडणुकांसाठी सोशल मीडियाचा आधार पूर्णपणे घेतला जातो. पण पूर्णपणे वर्च्युअल प्रचार मोहीम कुठेही चालवली जात नाही. अमेरिकेत गेल्या वर्षी कोरोना महामारी सुरू असतानाच निवडणुका झाल्या. त्या काळात सभा खूप कमी झाल्या आणि ऑनलाईन चर्चा किंवा ऑनलाईन रॅली अशा तंत्रज्ञानाचा आधार घेण्यात आला होता. २०२०ला ६४ देशांनी कोरोना महामारीमुळे निवडणुका रद्द केल्या. त्याचवेळी अमेरिका, फ्रान्स, दक्षिण कोरिया आणि बुरुंडीसह अनेक देशांनी निवडणुका घेतल्याही! अमेरिका आणि इतर काही देशांनी पोस्टल बॅलेटचा सर्वाधिक वापर केला. पण कोरोनापासून बचाव करण्यासाठी महागड्या अतिरिक्त उपाययोजना बऱ्याच कराव्या लागल्या. उदाहरणार्थ, दक्षिण कोरियात निवडणुकांवर १६ दशलक्ष डॉलर एवढा अतिरिक्त खर्च झाला.

आधुनिक विचारांचे
# वर्तमान



## 'माफियाराज विरोधात रस्त्यावर उतरणार'

बीड : जिल्ह्यामध्ये मोठा प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. माफियाराज सुरू झाला आहे, सामान्य लोकांचे हित धाब्यावर बसून स्वतःचे खिसे भरण्याचे काम सुरू आहे. हा प्रकार आपण सहन करणार नसून रस्त्यावर उतरण्याा इशारा देत म्हणत पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर सडकून टीका केली. बीड जिल्ह्यातील केज पंचायत समितीच्या नूतन इमारतीच्या उद्‌घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.



# झेप घेणाऱ्या पंखांना बळ देणारा राजकारणी

## गुणवंत शितल जाधवची मेडिकल फिस आर.टी.देशमुखांनी भरली

प्रतिनिधी



माजलगाव : गुणवंत विद्यार्थीनी शितल जाधव आईच्या अकाली जाण्याने एका पंखाने उणी झाली. तिच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नाला पूर्णविराम लागतो की काय? अशा परिस्थितीत माजी आमदार आर.टी.देशमुख पुढे आले आणि शितलची मेडिकल फिस भरली. झेपावणाऱ्या पंखांना बळ देणाऱ्या या सामाजिक दानत्वामुळे आर.टी.देशमुख यांचे साळिंबावासियांनी धन्यवाद मानले.

आईचे स्वप्न होते मुलीने डॉक्टर व्हावं मुलगी हुशार परंतु घरात गरिबी. वडील शेतकरी, बारावीला मुलीला चांगले मार्क्स पडले. कोणतंही आरक्षण नाही त्यात प्रचंड आर्थिक अडचण पैश्याअभावी मुलीचं स्वप्न पालक पूर्ण करू शकत नव्हते. आईला या गोष्टीचा प्रचंड धक्का बसला आपल्यामुळे मुलीचं स्वप्न पूर्ण होत नसल्याने नैराश्यात आईने स्वतःची जीवनयात्राच संपवली. कुटुंबाचे सांत्वन करायला नित्याप्रमाणे शेकडो राजकारणी आले. त्यात निवडणुकीचा हंगाम असल्याने सांत्वन करणाऱ्यांची तर रांगच लागलेली. मुलीलाही प्रचंड धक्का बसलेला परिवार या अनपेक्षित धक्याने पुरता हादरून गेला परंतु सांत्वन करणाऱ्यात एक राजकारणी असे होते, त्यांनी मुलीचे पालकत्व सांभाळले तुझ्या आईचे, कुटुंबाचे स्वप्न मी पूर्ण करतो. काळजी करू नको असे म्हणून ती व्यक्ती सदरील मुलीला घेऊन तडक महाविद्यालयात गेली आणि मुलीची फिस भरून तिला मेडिकलला प्रवेश मिळवून दिला ती व्यक्ती म्हणजेच आपले जिजा.



बीड : शितल जाधवची मेडिकल फिस भरताना भाजपाचे नेते रामेश्वर सावंत, शिवाजी तौर, गणेश जाधव, अतुल जाधव

माजी आमदार आर.टी.देशमुख ऊर्फ जिजा यांनी शितल जाधवला केवळ प्रवेश मिळवून तर दिला नाही तर प्रत्येक वर्षीची फिस त्यांनी महाविद्यालयाला पाठवून दिली. दरम्यान, जिजा आजारी पडले एक नाही दोन नाही तर वर्षभर ते दवाखान्यात होते. त्यांच्यावर १५ तास शस्त्रक्रिया चालली. दवाखान्यात जीवन मृत्यूशी लढत असतानाही त्यांनी शितलच्या दुसऱ्या वर्षाचीही फिस महाविद्यालयात जमा केली. देवकृपेने जिजांनी मृत्यूवर मात केली. जिजा ठणठणीत होऊन सार्वजनिक जीवनात पुन्हा सक्रिय झाले आता शितलच्या तिसऱ्या वर्षाचीही फिस त्यांनी महाविद्यालयात जमा करून शितल जाधवच्या शिक्षणाची घेतलेली जबाबदारी पूर्ण केली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# जिल्ह्यात साथीच्या रोगाचे थैमान

## बदलत्या हवामानामुळे रूग्ण संख्येत वाढ

प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात कोरोनापेक्षा इतर साथीचे रोग बळावल्याने विविध रूग्णालयात रूग्णांची गर्दी वाढत आहे. दरम्यान अंगदुखी, हिवताप आदी साथीचे रोग बदलत्या हवामानामुळे वाढले असल्याची माहिती आरोग्यसूत्रांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यात सध्या विविध साथीचे रोग बळावल्याने दवाखान्यांकडे रूग्णांची रिघ लागली आहे. मात्र यात कोरोना बाधितांची संख्या कमी झाली आहे. ही दिलासादायक बाब असल्याचे आरोग्यसूत्रांचे म्हणणे आहे.

घरीच घेत आहेत कोरोना रूग्ण उपचार

बीड जिल्ह्यात कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात असल्याने प्रशासनासह नागरिकात चिंतेचे वातावरण निर्माण होत असतानाच सुखद माहिती समोर येत आहे. जिल्ह्यात एकूण १६००च्या आसपास ॲक्टिव्ह रूग्णांपैकी तब्बल १४५०



रूग्ण हे घरीच आयसोलेट होत उपचार घेत आहे तर बीड जिल्हा रूग्णालयात केवळ १० रुग्ण उपचार घेत असून यातील एकाही रूग्णाला व्हेंटीलेटरची गरज भासलेली नाही. तिकडे अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात एकूण तीन वॉर्डात १५ रुग्ण असून यामध्ये ४ गरोदर महिलांना कोरोनाची लागण झालेली आहे. यापैकी १० रूग्णांना एखाद दुसऱ्या लिटरने ऑक्सिजनची गरज भासत आहे. त्यामुळे सध्या रूग्ण वाढत असले तरी विषाणूची तीव्रता ही तेवढी भासत नाही. दुसरीकडे मात्र १७ जानेवारी ते २३ जानेवारीच्या दरम्यान दोन जणांचा मृत्यू झाल्याचा आकडा समोर आला आहे. गेल्या २० दिवसांच्या कालखंडात एक अंकावर असलेला कोरोना बाधितांचा आकडा तीनशेच्या आसपास गेला मात्र रविवारपासून पुन्हा हा आकडा दोनच्या आसपास दिसून येत आहे. जिल्ह्यात एकूण रविवारपर्यंत १ हजार ५४७ रूग्ण ॲक्टिव्ह असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. यामध्ये १ हजार ४२६ रूग्ण हे घरीच आयसोलेशन होत उपचार घेत आहेत. १२१ रूग्ण हे जिल्ह्यातील विविध कोविड सेंटरमध्ये उपचार घेत असून बीड जिल्हा रुग्णालयात केवळ १० रूग्ण उपचार घेत आहेत. यातील एकाही रूग्णाला अद्याप पर्यंत व्हेंटीलेटरची गरज भासलेली नाही. अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयामध्ये एकूण ३ वॉर्डात १५ बाधित रूग्णांवर उपचार सुरू आहेत. यात ४ सिझर झालेल्या महिलांचा समावेश आहे, अशी माहिती प्रशासनाकडून मिळाली आहे.

### कोरोनाबाबत अनाठायी भीती नको : डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले



सद्यस्थितीत वाढलेल्या विविध साथरोगांबद्दल माजलगावस्थित नामांकित संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ.ज्ञानेश्वर गिलबीले म्हणाले, कोरोनापेक्षा विविध संसर्गजन्य रोगांचे रूग्ण माजलगाव तालुक्यात वाढत आहेत. याचे कारण बदलते हवामान, मात्र पुढील आठवड्यात याचे प्रमाण कमी होईल. कोरोना रूग्णांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे जनतेने घाबरण्याचे अजिबात कारण नाही, असे आवाहन डॉ.गिलबिले यांनी केले.

## फास्टट्रॅकन्यूज

### जाहिरात बीलांसाठी प्रेमनाथ कदम यांचे उपोषण

परळी : विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते यांच्याकडे असलेले जाहिरात मिळावीत या मागणीसाठी येत्या २६ जानेवारी प्रजासत्ता दिनी दैनिक सुर्योदयचे परळी तालुका प्रतिनिधी प्रेमनाथ कदम हे बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषणास बसणार आहेत.

परळी तालुक्यातील अनेक राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते हे वर्तमानपत्रात विविध जाहिराती देतात. आणि आपल्या कार्याची प्रसिद्धी करून घेतात. वर्तमानपत्रे ही जाहिरातींवर अवलंबून असतात. ती वेळेवर मिळाली तर त्याचा उपयोग होतो. अनेक नेते व कार्यकर्ते जाहिरात बील पत्रकार मागे लागले तरी देत नाहीत. उलट काही जण पत्रकारांशी उलट बोलतात. थकलेली जाहिरात बीले अशा नेत्यांनी व कार्यकर्ते यांनी द्यावीत या मागणीसाठी प्रजासत्ताक दिनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पत्रकार प्रेमनाथ कदम अमरण उपोषण करणार असून याबाबत परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी यांना काल निवेदन देण्यात आले असल्याचे कदम यांनी म्हटले आहे.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

# अण्णाभाऊ साठे महामंडळ सुरू करा

## डेमोक्रेटिक पार्टीचे बीडमध्ये आंदोलन; कार्यकर्त्यांची जोरदार घोषणाबाजी

प्रतिनिधी

बीड : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, गेल्या अनेक वर्षापासून बंद असल्याने, बीडमध्ये डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

डेमोक्रॅटिक पार्टीच्या कार्यकर्त्यांनी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या विरोधात, कुलूप ठोको आंदोलन केलं. यावेळी महामंडळास एक हजार कोटींची तरतूद करावी, या मंडळाचा अध्यक्ष नेमण्यात यावा, विविध योजना ज्या बँकांमार्फत दिल्या जातात त्यांना कर्ज मंजूर करण्यासंदर्भात सूचना देण्यात याव्यात, महामंडळाचे कर्ज सरसकट माफ करावे, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, येणाऱ्या दिवसात या आंदोलनाची दखल घेऊन मागण्या पूर्ण केल्या नाही, तर आझाद मैदानावर उग्र स्वरूपाचे आंदोलन करू, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.




# 'शेतातील रस्ता खुला करा, अन्यथा आत्मदहन करणार'

प्रतिनिधी

माजलगाव : शेतातील रस्ता खुला करण्यात यावा या मागणीसाठी गेल्या चार वर्षापासून तहसिल कार्यालयात चकरा मारूनही न्याय मिळत नाही. यामुळे जमीन पडीक ठेवण्याची कुटुंबावर वेळ आली आहे. सुस्त प्रशासनाच्या विरोधात येथील रंजित जाधव यांनी येत्या २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनी आत्मदहान करण्याचा इशारा दिला आहे.

तहसिलदार यांना वारंवार विनंती करून देखील त्यांनी गांभीर्यपूर्वक कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाला पंधरा दिवसांपूर्वी निवेदन दिले आहे, तरी देखील अद्याप कुठलीही कार्यवाही केलेली नाही. या नाकर्तेपणाला कंटाळून आत्मदहन करत असल्याचे रंजित जाधव यांनी म्हटले आहे.

रस्त्या अभावी ती देखील पडीक ठेवावी लागत आहे. त्यामुळे माझ्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. न्याय मिळत नसल्यामुळे रस्त्यासाठी २६ जानेवारी २०२२ रोजी झेंडावंदन नंतर तहसिल कार्यालय येथे आत्मदहन करणार असून याला तहसिल प्रशासन जिम्मेदार राहील असे, त्यांनी म्हटले आहे.

# माजलगावात उभारले अत्याधुनिक मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षण केंद्र

## रियाज काझी यांची स्वप्नपूर्ती; मराठवाड्यातील पहिलाच प्रयोग

भगीरथ तोडकरी

माजलगाव : मनाशी स्वप्न बाळगणारा युवक काय करू शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रियाज काझी. रियाज काझी यांनी माजलगाव शहरात आर.के. स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्र सुरू करून बेरोजगार युवकांना संधीचे दालन खुले केले आहे. अत्याधुनिक मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षण संस्था मराठवाड्यातील पहिली असल्याचा दावा करण्यात आला आहे.

आर.के.आर.के. स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्रात एका बॅचला किमान दहा विद्यार्थी प्रशिक्षण घेवू शकतात. त्यासाठी अनुभवी तज्ज्ञांची टीम नियुक्त केलेली आहे. फास्टट्रॅक कोर्स एका महिन्याच्या कालावधीसाठी तर प्रायमरी पासूनचा कोर्स ३ महिने कालावधीचा आहे. ९० टक्के प्रॅक्टिकल वर आधारित कोर्स उपलब्ध असून जीवनात स्वावलंबी होणाऱ्या युवकांसाठी ही सुवर्णसंधी असल्याचे संचालक रियाज काझी यांनी सांगितले.

या प्रशिक्षण केंद्रात प्रत्येक प्रशिक्षणार्थीला सूक्ष्मदर्शक, टच रिपेअर मशीन, डी.एस.ओ. मशीन, डिस्प्ले रिपेअर मशीन आणि एल.सी.डी.मार्फत मार्गदर्शन केले जाते. या प्रशिक्षण केंद्राचे गेल्या २४ ऑक्टोबर रोजी उद्घाटन झाले. त्यानंतर मोठा प्रतिसाद मिळत आहे. आर.के. स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्रामार्फत अनेक युवक प्रशिक्षित होवून आपला स्वतंत्र व्यवसाय उभा करावा यासाठी माझी सर्व धडपड सुरू आहे, अशी माहिती रियाज काझी यांनी दिली. एवढे हायटेक मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षण केंद्र माजलगावसारख्या ग्रामीण भागात सुरू केले आहे. त्याचा लाभ सर्वार्थाने ग्रामीण युवकांनी घेण्याची गरज असल्याचे आवाहन काझी यांनी केले आहे. सुसज्ज आणि अत्याधुनिक यंत्रणा उभी करून माजलगावात सुरू झालेले हे प्रशिक्षण केंद्र मराठवाड्यातील पहिले आहे, असा दावा इन्स्टिट्यूटच्या वतीने करण्यात आला आहे.



### जनतेची लूट थांबावी म्हणून घेतला पुढाकार

मोबाईल दुरूस्ती क्षेत्रात प्रचंड लूट आहे. अशा परिस्थितीत आपण जरी व्यवसाय करत असलो तरी समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, याच भावनेतून माजलगावात अद्ययावत मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षण संस्था सुरू केली. जीवनात अनेक दर्जेदार कामे करावयाची आहेत. त्यापैकी एक स्वप्नपूर्ती झाली असे म्हणता येईल, अशी भावना 'वर्तमान'शी बोलताना रियाज काझी यांनी व्यक्त केली.

### येथे भेट द्या किंवा संपर्क साधा



माजलगावात आर.के. स्टॅन्डर्ड मोबाईल दुरूस्ती ॲण्ड प्रशिक्षण केंद्र सुरू करून तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी संचालक रियाज काझी यांची धडपड सुरू आहे. युवकांना व्यवसायात उभे करण्यासाठी हे ट्रेनिंग सेंटर निर्णायक भूमिका बजावत आहेत. ट्रेनिंग सेंटरमधील विविध कोर्स बाबत अधिक माहिती घेण्यासाठी माजलगावस्थित ठक्कर बाजार, जुने बसस्थानक परिसर येथे भेट द्यावी किंवा ९२२५८७०९८७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन इन्स्टिट्यूटतर्फे करण्यात आले आहे.

# राज्य कोरोनामुक्त व्हावे, शेतकरी समृद्ध व्हावा

## मंत्री धनंजय मुंडे यांची गहिनीनाथगडावर प्रार्थना

▶ प्रतिनिधी

पाटोदा : प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीक्षेत्र गहिनीनाथगड येथील पारंपरिक महापूजेस उपस्थित राराहणे हे भाग्याचे असून याप्रसंगी राज्य कोरोनामुक्त व्हावे, इथला शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी आम्हाला काम करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना सामाजिक न्याय मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केली.

संत वामनभाऊ यांच्या ४६ व्या पुण्यतिथी निमित्त पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथील वामनभाऊ यांच्या स्मृतिस्थळी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, गडाचे महंत ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांचे हस्ते पारंपरिक पद्धतीने महापूजा व महा आरती करण्यात आली. यावेळी प्रथमच आमदार रोहित पवार हेही या सोहळ्यास उपस्थित होते.

ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांना धनंजय मुंडे यांनी स्वतः फेटा बांधून आशीर्वाद घेतला तर गडावर प्रथमच आलेले आमदार रोहित पवार यांना देखिल धनंजय मुंडे यांनी स्वतः फेटा बांधून त्यांचे



गडावर स्वागत केले.

यावेळी कोरोना विषयक निर्बधांमुळे नेहमीप्रमाणे भाषण, कीर्तन व आशीर्वाद सोहळा न करता पारंपरिक पद्धतीने महापूजा व आरती करण्यात आली.मंत्री मुंडे यांच्यासह आमदार रोहित पवार, आमदार बाळासाहेब आजबे, सतिष शिंदे, शिवाजी महाराज नाकाडे, विश्वास नागरगोजे, गहिणीनाथ सिरसाट, विठ्ठल सानप, बन्सी खाडे, शिवदास शेकडे, अभिजित तांदळे यांसह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणारे अधिकारी निलंबित करा

## भाई ॲड.नारायण गोले पाटील यांची मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : छोटेवाडी येथील



एक शेतकरी अनेक महिन्यांपासून शेतरस्ता मिळविण्यासाठी अर्ज करत आहे. त्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे मात्र त्यानंतरही या प्रश्नाकडे तहसिलदार आणि मंडळाधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी केली आहे.

छोटेवाडी येथील भानुदास जाधव यांनी मागच्या अनेक महिन्यांपासून शेतरस्ता मिळविण्यासाठी अर्ज केले आहेत. शेतरस्ता नसल्याने त्यांना केल्याचा शेतात जाता येत नाही आणि जमिन पडीक ठेवावी लागत आहे. शेजारच्या लातूर जिल्ह्यात शेतरस्त्यांसाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. त्या ठिकाणी आमदारांकडून निधी उपलब्ध करण्याबरोबर रस्त्यांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा केला जात आहे. तर दुसरीकडे माजलगाव तालुक्यात शेतकरी भानुदास जाधव यांच्या मागणीकडे प्रशासनाने दुर्लक्ष आरोप शेकापचे भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी केला आहे. भानुदास जाधव यांनी शेत रस्त्यासाठी प्रजासत्ताक दिनी उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र त्यानंतरही प्रशासन कारवाई करत नसल्याने शेतकऱ्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबीत करावे अशी मागणी ॲड.गोले यांनी केली आहे.







आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.

# सत्कार्याची दखल नियतीला घ्यावीच लागते

## आमदार निलेश लंके यांचे प्रतिपादन; पत्रकार सुरक्षा समितीचा पुरस्कार वितरण सोहळा थाटात





प्रतिनिधी

माजलगाव : प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावरच ध्येय गाठू शकता. समाजकारणात आपले सत्कार्य चालूच ठेवा. खचू नका, हरू नका, नियतीला चांगल्या कामाची दखल घ्यावीच लागेल. असे प्रतिपादन पारनेर-नगरचे आमदार निलेश लंके यांनी केले. ते माजलगाव येथील पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने आयोजित मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण प्रसंगी बोलत होते.

माजलगाव सुरक्षा समितीच्या वतीने येथील वैष्णवी मंगल कार्यालयात दि.२१ जानेवारी रोजी मूकनायक दिनानिमित्त मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार वितरणाचे आयोजन केले होते. या व्यासपीठावर आमदार निलेश लंके यांची उपस्थिती होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार प्रकाश सोळंके हे उपस्थित होते. मोहनराव जगताप, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजासाहेब देशमुख, सभापती सुदाम पवार, साहित्यिक तथा लेखक दिग्दर्शक डॉ.अनिलकुमार साळवे, विरेंद्र सोळंके, आदीसह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख दिवंगत बिपीन रावत, दिवंगत सिंधुताई सपकाळ, जेष्ठ विचारवंत भाई डॉ.एन.डी पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना आमदार निलेश लंके असे म्हणाले की, मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार प्राप्त सर्वांचे अभिनंदन करत चांगल्या कामातून त्या व्यक्तीची ओळख निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. चांगल्या कामातून त्या व्यक्तीची ओळख निर्माण होते, मी सुध्दा लोकांची कामे अहोरात्र करत गेलो मी आमदार पद किंवा सरपंच पद या पलिकडे जाऊन लोकांची कामे करत होतो आणि करत आहे. कोविडच्या महाभयानक काळामध्ये मी लोकांना धीर देण्याचे काम त्याचबरोबर त्यांच्यासोबत खंबीरपणे सोबत राहून त्यांची काळजी घेण्याचे काम केले आहे. तर आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, मूकनायकाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाल दिशा देण्याचे काम केले असून पत्रकारिता हा समाजाचा आरसा आहे, आणि आजच्या पत्रकारांनी सत्य परिस्थिती समाजासमोर बातमीच्या माध्यमातून आणली पाहिजे. खऱ्या अर्थाने पत्रकारांनी समाजाला दिशा देण्याचे काम करावे असे आमदार प्रकाश सोळंके यांनी अध्यक्षीय समारोपाप्रसंगी व्यक्त केले.

### जितेंद्र सिरसाट, अशोक खाडेंचा सन्मान

मूकनायक पुरस्काराने जितेंद्र सिरसाट, माजलगाव तालुक्याचे भूमिपुत्र अशोक खाडे यांन गौरविण्यात आले तर माजलगाव भूषण पुरस्काराने भाई गंगाभिषण थावरे, डॉ.वसिम मनसबदार, राहूल फुलगे, शिवहारी यादव, रूपचंद आभारे यांचा गौरव करण्यात आले.



# जयमहेश कारखान्याचे दूषित पाणी त्वरित थांबवा

## शिंपेटाकळी ग्रामस्थांचे प्रशासनाला निवेदन



माजलगाव : जय शुगर्स लिमिटेड पवारवाडी येथील दूषित पाणी रोषणपुरी बंधाऱ्यात जमा होत असल्याने या बंधाऱ्यातील पाणी दूषित झाले आहे. हा प्रकार त्वरित थांबवावा अन्यथा तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा किसन महादेव कसबे, ग्रुप ग्रामपंचायत शिंपेटाकळी यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

तहसिलदार माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात किसन महादेव कसबे यांनी म्हटले आहे की, शिंपेटाकळी ग्रामस्थांनी जय महेश साखर कारखाना प्रशासनाकडून दूषित पाणी बंधाऱ्यात सोडले जात आहे. या पाण्याचा उपयोग ग्रामस्थ शेतीसाठी, घरगुती वापरासाठी, पिण्यासाठी वापर करीत आहेत. जय महेशच्या दूषित पाण्यामुळे चारीतील पाणी दूषित होत चालले आहे. हा प्रकार थांबला नाही तर ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष द्यावे, अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या सर्व संबंधितांना ग्रामस्थांनी दिले आहे.

# रक्तदानातून शिवसैनिकांनी केले शिवसेनाप्रमुखांना अभिवादन

प्रतिनिधी

माजलगाव : हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त येथे आयोजित भगव्या सप्ताहाच्या सातव्या दिवशी रविवारी शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित महारक्तदान शिबिरात शिवसैनिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत ५१ जणांनी रक्तदान केले. दरम्यान, भगव्या सप्ताहानिमित्त माजलगाव तालुक्यात शिवसेनेतर्फे विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले.

सध्या कोरोना महामारीमुळे रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. गरजू रूग्णांना रक्त उपलब्ध व्हावे याकरिता शिवसेनेच्या वतीने वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त भगव्या सप्ताहाचे आयोजन १७ पासून करण्यात आले होते. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी चुन्नूमा चौकात युवासेनेच्या वतीने शिवसेनाप्रमुखांना अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता. तेथे शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, युवासेना बीड जिल्हाप्रमुख शुभम डाके, नगरसेवक अशोक आळणे, अतुल उगले, अभिजित कोंबडे, सूरज गवरकर, दत्ता रांजवण, विक्रम शिंदे, प्रदीप तांबे, कल्याण बल्लाळे यांनी शिवसेनाप्रमुखांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या ठिकाणी शिवसेनाप्रमुखांच्या विचारांना मानणाऱ्या शिवसेनाप्रेमी नागरिकांनी देखील साहेबांना अभिवादन केले.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित रक्तदान शिबिरामध्ये जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांच्यासह शिवसैनिकांनी रक्तदान केले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, युवासेना बीड जिल्हाप्रमुख शुभम डाके, तुकाराम येवले, नगरसेवक अशोक आळणे, ज्येष्ठ शिवसैनिक प्रल्हाद सोळंके, संभाजी पाष्टे, दिगंबर सोळंके, अमोल डाके, युवासेनेचे जिल्हा उपप्रमुख राहुल सुरवसे, लक्ष्मण सोळंके, नामदेव सोजे, युवासेना शहरप्रमुख विशाल थावरे, विठ्ठल जाधव, कल्याण बल्लाळे, बाळासाहेब मेंडके, प्रल्हाद घाटूळ, नारायण तौर, जयराम राऊत, करण थोरात, राम कुलकर्णी, प्रदिप तांबे, अभिजीत देडे, सुखदेव धुमाळ, रूपेश घोडके यांच्यासह शिवसेना, युवासेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांची उपस्थिती होती.




# तेलगावच्या चूलमटनमधून दारूचा साठा जप्त

## दबंग एपीआय प्रभा पुंडगे यांची कारवाई

प्रतिनिधी



तेलगाव : आपल्या दबंग कार्यशैलीमुळे परिचित असलेल्या दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पुंडगे यांनी परिसरातील अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यासाठी कडक भूमिका घेतल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, माजलगाव रोडवरील चूलमटन या हॉटेलमध्ये देशी/विदेशी दारूचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे.

दिंद्रुड पोलीस ठाण्यातील कार्यरत महिला पोलीस अधिकारी प्रभा पुंडगे यांनी तेलगाव येथील माजलगाव रोड भागातील आगलावे यांच्या हॉटेल चूल मटन व परळी रस्त्यावरील हॉटेल सह्याद्रीवर छापा टाकून साडे चार हजाराची देशी/विदेशी दारू पकडून दोन तरूणांना ताब्यात घेऊन अटक केल्याने गजबजलेल्या चौकात एकच खळबळ उडाली. गेल्या काही दिवसापासून सदर दोन्ही हॉटेलात अनधिकृतरित्या देशी, विदेशी दारूची विक्री होत आहे. अशा तक्रारी समोर आल्याने सोमवारी सायंकाळी दोन्ही हॉटेल वरील धाडीत आगलावेच्या हॉटेल चूल मटनवरून नऊ विदेशी बॉटल अन् एका तरूणाला ताब्यात घेतल्याने आता तर हॉटेल चालक आगलावे लाच आग लागली अशी चर्चा सुरू होती. तर काही क्षणात टाकलेल्या दुसऱ्या धाडीत हॉटेल सह्याद्री वरून तीन हजारांच्या ९६ बॉटल पकडून तेथूनही एका युवकाला ताब्यात घेतले. कर्तव्यावर हजर झाल्यानंतर प्रथमच अशी कारवाई केल्याने इतरांचे धाबे दणाणले आहेत. मुंबई दारू बंदी अधिनियम ६५ ई कलमान्वये ही कारवाई करण्यात आली असून सहायक पोलिस निरीक्षक प्रभा पुंडगे यांच्या मार्गर्शनाखाली सुरेवाड, भालेराव हे पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, एपीआय प्रभा पुंडगे यांनी घेतलेल्या दबंग भूमिकेमुळे अवैध धंद्यावाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

# अतिरिक्त उसाचा प्रश्न मार्गी लागणार

## 'जय महेश'चे उपाध्यक्ष गिरीश लोखंडे यांची माहिती

प्रतिनिधी

माजलगाव : जय महेश साखर कारखान्याने तालुका व परिसरात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरिता सात हजार प्रतिदिन गाळप क्षमता असलेली वाढवून आठ हजार प्रतिदिन गाळप क्षमता केली आहे. पुढील पंधरा दिवसांत ही गाळप क्षमता ८,५०० प्रतिदिन पर्यत नेण्यात येणार आहे, अशी माहिती कारखाना उपाध्यक्ष गिरीश लोखंडे यांनी दिली.

तालुका व परिसरामध्ये असणाऱ्या ऊस उत्पादकांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने पवारवाडी येथील खासगी तत्त्वावरील जय महेश कारखान्याच्या वतीने काही शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी लोखंडे म्हणाले की, माजलगावचे जलाशय शंभर टक्के भरले आहे. तसेच उसाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर असल्याने जय महेश कारखाना प्रशासनाने पुढील गाळप हंगामामध्ये दहा हजार मेट्रीक टन प्रतिदिन गाळप क्षमता करण्याचा निर्णय घेतला आहे. मकर संक्रांतीच्या सणाला प्रत्येक विभागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मान करावयाचा होता. परंतु, तांत्रिक अडचणींमुळे गुरूवारी हा कार्यक्रम घेण्यात आला. एकरी शंभर टन उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कारखान्याच्या वतीने विविध योजना राबविण्यात येणार आहेत, असेही ते म्हणाले. यावेळी अॅड.भानुदास डक, मारोती सोळंके, रमण मोटेगांवकर, विलास ढोबळे, गोविंद झेटे, केशव फपाळ, घनशाम भुतडा, राजेसाहेब शेंडगे, भगवान कदम, अमृत गिराम, पांडुरंग तांदळे, वैभव खोत, गणेश हरकाळ, प्रल्हाद गलांडे, महेश कदम, अप्पासाहेब काकडे, जयराम पवार, आनंद डाके, ज्ञानेश्वर सुरवसे, दत्तात्रय काळे यांची उपस्थिती होती. शेतकी अधिकारी सुजय पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

### किट्टीआडगावात महिलांचा अनोखा सन्मान



माजलगाव : किट्टीआडगाव येथे मकरसंक्रांतीच्य निमित्ताने महिलांना रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट देवून महिलांचा अनोखा सन्मान करताना पल्लवी विरेंद्र सोळंके, रंजना आगे, वर्षा खेत्रे, अनिता आगे, अलकनंदा आगे, रेवती काळे आदी.

# 'अलफलाह'च्या विवाह सोहळ्यात २० जोडपी निकाहबद्ध

प्रतिनिधी

माजलगाव : येथील अलफलाह कमिटीच्या पुढाकारातून गरजू वीस वधू-वरांचा विवाह लावण्यात आला. शहरातील मुलांच्या जिल्हा परिषद शाळेत रविवारी हा कार्यक्रम झाला. दरम्यान, अलफलाह कमिटीच्या सामूहिक विवाह सोहळ्यात २० जोडपी निकाहबध्द झाली आहेत.

येथील अलफलाह कमिटीच्या वतीने मागील ९ वर्षापासून समाजातील गरजू वधू-वरांचे शुभमंगल लावण्यात येते. त्याचबरोबर कमिटीच्या वतीने विवाह सोहळ्यात नवदाम्पत्यांना कपाट, कॉट, सोफासेट, रॅक, गॅस, कुलर, फॅन, मिक्सर, मेकअप आरसा यासह संसारोपयोगी साहित्य देखिल दिले जाते. रविवारीही वीस जोडप्यांचा विवाह लावण्यात आला.

दरम्यान, हाफीज लतीफ, डॉ.संजय जेथलिया यांना सामाजिक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. लग्नासाठी आलेल्या वऱ्हाडी मंडळींसाठी भोजनाची सोय करण्यात आली होती. शहरामध्ये स्वच्छतेचे काम करणारे शेख महेबूब शेख चाँद आणि निराधार लोकांना मागील अनेक वर्षापासून जेवण देणाऱ्या दत्तात्रय गोपीनाथ चव्हाण यांचा देखील सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला. विवाह सोहळ्यात कोरोनाच्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले. अलफलाह कमिटीच्या वतीने आजपर्यंत मागील नऊ वर्षात ९६ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत.




# सिद्धार्थ खरात यांच्या नियुक्तीचा बीडमध्ये आनंदोत्सव

प्रतिनिधी

बीड : महाराष्ट्र शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या डॉ.बी.आर.आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीवर मंत्रलायातील उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव तथा राज्याचे ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांचे खाजगी सचिव सिद्धार्थ खरात यांनी नियुक्ती करण्यात आली.त्यांच्या नियुक्तीचा एस.के. समाज संस्थेचे संस्थापक मोहन राठोड, सोमेश्वर सोनटक्के, अमोल आनेराव, अर्चना राठोड, रूक्मिणी राठोड, अमोल सोळंके यांनी पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

### गाडीचे कागदपत्रे हरवले आहे

महेश सुमंतराव बादाडे या नावाच्या मालकीच्या गाडीचे गाडी नंबर एमएच ११ ए.के.६५४० कागदपत्रे (आर.सी.बुक) हे माजलगाव ते शहाजानपूर प्रवासादरम्यान हरवले आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क : ७०२०२०७१०९




























आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.